"नवीन वर्षामध्ये अखंड महादानी, अखंड निर्विघ्न, अखंड योगी आणि सदैव सफलतामूर्त बना"

आज बापदादा आपल्या समोर डबल सभेला बघत आहेत. एक तर साकारमध्ये समोर बसले आहेत आणि दुसरे दूर बसून सुद्धा हृदयाजवळ दिसून येत आहेत. दोन्ही सभेतील श्रेष्ठ आत्म्यांच्या मस्तकामध्ये आत्म दीप चमकत आहे. किती सुंदर चमकत असलेले दृश्य आहे. इतके सर्व एका संकल्पामध्ये, एकरस स्थितीमध्ये स्थित परमात्म प्रेमामध्ये लवलीन एकाग्र बुद्धीने प्रेमामध्ये एकरूप झालेले किती सुंदर वाटत आहेत. तुम्ही सर्वजण आज विशेष नवीन वर्ष साजरे करण्यासाठी पोहोचला आहात. बापदादा देखील सर्व मुलांचा उमंग-उत्साह पाहून, चमकत असलेल्या आत्म दीपकांना पाहून हर्षित होत आहेत.

आजचा दिवस संगमाचा दिवस आहे. एक वर्षाची, जुन्याची विदाई (निरोप) आहे आणि नवीन वर्षाची बधाई (आगमन) होणार आहे. नवीन वर्ष अर्थात नवीन उमंग आणि उत्साह, स्व परिवर्तनाचा उमंग आहे, सर्व प्राप्तींना स्वतःमध्ये उपलब्ध झाल्याचे पाहून हृदयामध्ये उत्साह आहे. दुनियावाले देखील हा उत्सव साजरा करतात, त्यांच्यासाठी एक दिवसाचा उत्सव आहे आणि तुम्हा लकी, लवली (भाग्यवान, लाडक्या) मुलांसाठी संगमयुगाचा प्रत्येक दिवस उत्सव आहे कारण आनंदाचा उत्साह आहे. दुनियावाले तर विझलेल्या दिव्यांना पेटवून वर्ष साजरे करतात आणि बापदादा, तुम्हा इतक्या सर्व चोहो बाजूंच्या जागृत झालेल्या दीपकांसोबत नवीन वर्षाचा उत्सव साजरा करण्यासाठी आले आहेत. हे तर रीती रिवाज साजरा करण्यासाठी निमित्त मात्र करता परंतु तुम्ही सर्व जागृत दीपक आहात. आपला चमकणारा दीपक दिसून येत आहे ना! जो अविनाशी दीपक आहे.

तर नवीन वर्षामध्ये प्रत्येकाने आपल्या मनामध्ये स्वयंप्रति, विश्वातील आत्म्यांप्रति कोणता नवीन प्लॅन बनवला आहे का? १२ वाजल्या नंतर नवीन वर्ष सुरु होईल तर या वर्षाला विशेष कोणत्या रूपामध्ये साजरे करणार? जसे जुने वर्ष निरोप घेणार तर तुम्ही सर्वांनी देखील जुने संकल्प, जुने संस्कार यांना निरोप देण्याचा संकल्प केला आहे? वर्षा सोबतच तुम्ही देखील जुन्याला निरोप देऊन नवीन उमंग-उत्साहाच्या संकल्पांना प्रॅक्टिकलमध्ये आणणार ना! तर विचार करा आपल्यामध्ये काय नविनता आणणार? कोणत्या नवीन उमंग-उत्साहाची लाट पसरवणार? कोणत्या विशेष संकल्पाचे व्हायब्रेशन पसरवणार? विचार केला आहे? कारण तुम्ही सर्व ब्राह्मण साऱ्या विश्वातील आत्म्यांकरिता परिवर्तन निमित्त आत्मे आहात. विश्वाचे फाउंडेशन आहात, पूर्वज आहात, पूज्य आहात. तर या वर्षी आपल्या श्रेष्ठ वृत्ति द्वारे कोणती व्हायब्रेशन्स पसरवणार? जसे प्रकृति चोहो बाजूला कधी गर्मीचे, कधी थंडीचे, कधी बहराचे व्हायब्रेशन पसरवते. तर तुम्ही प्रकृतीचे मालक प्रकृतिजीत कोणते व्हायब्रेशन पसरवाल? ज्यामुळे आत्म्यांना थोड्या वेळासाठी तरी सुख-शांतीचा अनुभव होईल. यासाठी बापदादा हाच इशारा देत आहेत की जे काही खजिने प्राप्त झाले आहेत त्या खजिन्यांना सफल करा आणि सफलता स्वरूप बना. विशेषत: वेळेचा खजिना कधीही व्यर्थ जाऊ नये. एक सेकंद देखील व्यर्थाला कार्यामध्ये लावा. समयाला सफल करा, प्रत्येक श्वासाला सफल करा, प्रत्येक संकल्पाला सफल करा, प्रत्येक शक्तीला सफल करा, प्रत्येक गुणाला सफल करा. सफलतामूर्त बनण्याचे हे विशेष वर्ष साजरे करा कारण सफलता तुमचा जन्मसिद्ध अधिकार आहे. त्या अधिकाराला आपल्या कार्यामध्ये लावून सफलतामूर्त बना; कारण आत्ताची सफलता अनेक जन्म तुमच्या सोबत रहाणार आहे. तुमच्या वेळेच्या सफलतेचे प्रारब्ध म्हणून तुम्हाला पूर्ण अर्ध कल्प सफलतेचे फळ प्राप्त होईल. आत्ताच्या वेळेच्या सफलतेचे प्रारब्ध पूर्ण वेळ प्राप्त होईल. श्वासाला सफल केल्यामुळे भविष्यामध्ये बघा तुमच्या श्वासाच्या सफलतेचा परिणाम भविष्यामध्ये सर्व आत्मे पूर्ण काळ स्वस्थ राहतात. आजाराचे नाव सुद्धा नाही. डॉक्टरांचे डिपार्टमेंटच नाही कारण डॉक्टर्स काय बनणार? राजा बनणार ना! विश्वाचे मालक बनणार. परंतु यावेळी तुम्ही श्वास सफल करता आणि सर्व आत्म्यांना स्वस्थ (निरोगी) राहण्याचे प्रारब्ध प्राप्त होते. तसेच ज्ञानाचा खजिना, त्याच्या फळ स्वरूप स्वर्गामध्ये तुमच्या स्वतःच्या राज्यामध्ये इतके हुशार, शक्तिशाली बनता ज्यामुळे तिथे कोणा वजिराकडून सल्ला घेण्याची आवश्यकता रहात नाही, स्वतःच हुशार, शक्तिशाली असतात. शक्तींना सफल करता, त्याचे प्रारब्ध तिथे सर्व शक्ती विशेषत: धर्म सत्ता, राज्य सत्ता

दोन्हीही विशेष शक्ती, सत्ता तिथे प्राप्त होतील. गुणांचा खजिना सफल करता तर त्याचे प्रारब्ध देवता पदाचा अर्थच आहे दिव्यगुणधारी आणि त्याच सोबत आता लास्ट जन्मामध्ये तुमच्या जड मूर्तीचे पूजन करतात तेव्हा काय महिमा करतात? ‘सर्वगुण संपन्न’. तर यावेळच्या सफलतेचे प्रारब्ध स्वतःच प्राप्त होते; त्यामुळे चेक करा - खजिने मिळाले, खजिन्यांनी संपन्न झाला आहात परंतु स्वयंप्रति अथवा विश्वाप्रति किती सफल केले आहे? जुन्या वर्षाला निरोप देणार तर जुन्या वर्षामध्ये कोणता जमा केलेला खजिना सफल केला, किती केला? हे चेक करा आणि येणाऱ्या वर्षामध्ये देखील या खजिन्यांना व्यर्थच्या ऐवजी सफल करायचेच आहे. एक सेकंद सुद्धा आणि कोणता खजिना देखील व्यर्थ जायला नको. अगोदर सांगितले आहे की संगम वेळेचा सेकंद, सेकंद नाहीये तर वर्षा समान आहे. असे समजायचे नाही एक सेकंद, एक मिनिटच तर गेले, व्यर्थ जाणे यालाच निष्काळजीपणा म्हटले जाते. तुम्हा सर्वांचे लक्ष्य आहे की ब्रह्मा बाबांप्रमाणे संपन्न आणि संपूर्ण बनायचे आहे. तर ब्रह्मा बाबांनी सर्व खजिने सुरुवातीपासून शेवटच्या दिवसापर्यंत सफल केले, याचे प्रत्यक्ष प्रमाण पाहिलेत - संपूर्ण फरिश्ता बनले. आपल्या लाडक्या दादीला देखील बघितले सफल केले आणि इतरांना देखील सफल करण्यासाठी सदैव उमंग-उत्साह वाढवला. तर ड्रामा नुसार विशेष विश्व सेवेच्या अलौकिक पार्टची निमित्त बनली.

तर यावर्षी, उद्यापासून दर दिवशी आपला चार्ट ठेवा - सफल आणि व्यर्थ... काय झाले आणि किती झाले? अमृतवेलेलाच दृढ संकल्प करा, स्मृती स्वरूप बना की सफलता माझा जन्म सिद्ध अधिकार आहे. सफलता माझ्या गळ्यातील हार आहे. सफलता स्वरूप अर्थातच समान बनणे आहे. ब्रह्मा बाबांवर प्रेम आहे ना. तर ब्रह्मा बाबांचे सर्वांत जास्त प्रेम कोणावर होते? जाणता ना, कोणावर प्रेम होते? मुरलीवर. लास्ट दिवशी सुद्धा मुरलीचा क्लास मिस केला नाही. समान बनण्यामध्ये हे चेक करा - ब्रह्मा बाबांचे ज्याच्यावर प्रेम राहिले, ब्रह्मा बाबांच्या प्रेमाचा पुरावा आहे - ज्याच्यावर बाबांचे प्रेम आहे त्याच्यावर माझे प्रेम आपोआप असायला हवे. ब्रह्मा बाबांची अजून विशेषता कोणती होती? सदैव अलर्ट, निष्काळजीपणा नाही. अखेरच्या दिवशी सुद्धा किती अलर्ट रूपामध्ये आपल्या सेवेचा पार्ट बजावला. शरीर कमजोर असून देखील कसे अलर्ट होऊन, आधार घेऊन बसले नाहीत आणि अलर्ट करून गेले. तीन गोष्टींचा मंत्र देऊन गेले. लक्षात आहे ना सर्वांच्या. तर जितके अलर्ट रहाल, फॉलो कराल, निष्काळजीपणा नाहीसा होईल. निष्काळजीपणाचे विशेष बोल बापदादा खूप ऐकत असतात. जाणता ना! जर या तीन शब्दांना (निराकारी, निर्विकारी आणि निरहंकारी) सदैव आपल्या मनामध्ये रिवाइज आणि रियलाईज करत रहाल तर ऑटोमेटिकली सहज आणि आपोआप समान बनालच. तर एक गोष्ट सफल करा आणि सफलतामूर्त बना.

बापदादांनी मुलांचा वर्षाचा रिझल्ट बघितला. काय पाहिले? महादानी बनला आहात, परंतु अखंड महादानी, ‘अखंड’ ला अंडरलाइन, ‘अखंड महादानी, अखंड योगी, अखंड निर्विघ्न’ आता याची आवश्यकता आहे. काय अखंड होऊ शकते? होऊ शकते का? पहिली लाईन वाले सांगा की अखंड होऊ शकते? हात वर करा जर होऊ शकत असेल तर. जो करू शकतो, करू शकता ना? मधुबनवाले सुद्धा हात वर करत आहेत. बापदादा मधुबनवाल्यांना अगोदर बघतात. मधुबनवर प्रेम आहे. शांतीवन किंवा पांडव भवन किंवा जे कोणी आहेत दादीच्या भुजा (सहयोगी) आहेत, सर्वांची काळजीपूर्वक देखभाल करतात. जर अखंड असाल, मनसाद्वारे शक्ती पसरवण्याच्या सेवेमध्ये बिझी रहा, वाचेद्वारे ज्ञानाची सेवा आणि कर्माद्वारे गुणदान किंवा गुणांचा सहयोग देण्याची सेवा करा.

आजकाल भले अज्ञानी आत्मे आहेत, किंवा ब्राह्मण आत्मे आहेत सर्वांना गुणांचे दान, गुणांचा सहयोग देणे आवश्यक आहे. जर स्वतः सहज सिम्पल रूपामध्ये सॅम्पल बनून रहाल तर ऑटोमॅटिक दुसऱ्यांना तुमच्या गुणमूर्तचा सहयोग आपोआप मिळेल. आजकाल ब्राह्मण आत्मे देखील सॅम्पल (उदाहरण) पाहू इच्छितात, ऐकू इच्छित नाहीत. आपसामध्ये देखील काय म्हणता? कोण बनले आहे? तर प्रत्यक्ष रूपामध्ये गुणमूर्त पाहू इच्छितात. तर कर्माद्वारे विशेष गुणांचा सहयोग, गुणांचे दान देण्याची आवश्यकता आहे. कोणीही ऐकू इच्छित नाहीत, पाहू इच्छितात. तर आता हे विशेष लक्षात ठेवा की मला ज्ञानाद्वारे, वाचेद्वारे तर सेवा करतच राहता आणि करतच राहायची आहे, सोडायची नाही परंतु आता मनसा आणि कर्म, मनसा द्वारे व्हायब्रेशन पसरवा. सकाश पसरवा. व्हायब्रेशन किंवा सकाश दूर बसून देखील पोहोचवू शकता. शुभ भावना, शुभ कामनेद्वारे कोणत्याही आत्म्याला मनसा सेवेद्वारे व्हायब्रेशन अथवा सकाश देऊ शकता. तर आता यावर्षी एक मनसा शक्तींचे व्हायब्रेशन, शक्तींद्वारे सकाश आणि कर्माद्वारे गुणांचा सहयोग किंवा अज्ञानी आत्म्यांना गुणदान

द्या.

नवीन वर्षामध्ये गिफ्ट सुद्धा देता ना. तर यावर्षी स्वतः गुणमूर्त बनून गुणांची गिफ्ट द्या. गुणांची टोली खाऊ घालता ना. भेटता तर टोली खाऊ घालता ना. टोली खाल्ल्याने आनंदीत होतात ना. काही आत्मे, पळून गेलेले सुद्धा टोलीची आठवण काढतात. इतर गोष्टी विसरून जातात परंतु टोलीची आठवण येते. तर यावर्षी कोणती टोली खाऊ घालणार? गुणांची टोली खाऊ घाला. गुणांची पिकनिक करा कारण बाप समान समयाच्या समीपतेनुसार आणि दादींच्या इशाऱ्यानुसार समयाची संपन्नता अचानक कधीही होणे संभव आहे म्हणून बाप समान बनायचे आहे किंवा दादींना प्रेमाचे रिटर्न द्यायचे आहे तर जी आवश्यकता आहे - मनसा आणि कर्माद्वारे सहयोगी बनण्याची, कोणी कसाही असेल, असा विचार करू नका, हे बनतील तर मी बनेन. नंबरवन बनायचे आहे तर कधी असा विचार करू नका की, हे बनतील तर मी बनेन. पहिला नंबर तर बनणारा बनेल, मग तुमचा नंबर दुसरा होईल. काय तुम्ही दुसरा नंबर बनू इच्छिता की पहिला नंबर बनू इच्छिता? तसे जर कोणाला म्हटले तुम्ही दुसरा नंबर घ्या तर घेतील? सगळे हेच म्हणतील पहिला नंबर घ्यायचा आहे. तर पहिला निमित्त बनायचे आहे. दुसऱ्याला निमित्त का बनवता, स्वतःला निमित्त बनवा ना. ब्रह्मा बाबांनी काय सांगितले? प्रत्येक गोष्टीमध्ये स्वतः निमित्त बनून निमित्त बनवले. हे अर्जुन बनून पार्ट बजावला. मला निमित्त बनायचे आहे. मला करायचे आहे. दुसरा करेल, मला पाहून इतर करतील, इतरांना बघून मी करेन, नाही. मला बघून इतर करतील. हा ब्रह्मा बाबांचा पहिला धडा आहे. तर ऐकले काय करायचे आहे? सफलता मूर्त, सफल सफलता मूर्त, अखंड दानी, मायेला येण्याची हिंमतच होणार नाही. जेव्हा अखंड महादानी बनाल, निरंतर सेवाधारी व्हाल, बिझी रहाल, मन-बुद्धी सेवाधारी बनून राहीली तर माया कशी येईल. तर आता या वर्षी काय बनायचे आहे? सर्वांचा एकच आवाज हृदयापासून निघावा, हे बापदादा इच्छितात, ते काय? नो प्रॉब्लेम, कम्प्लिट. प्रॉब्लेम नाही परंतु कम्प्लिट बनायचेच आहे. दृढ निश्चय-बुद्धी, विजयी माळेमध्ये जवळचा मणी बनायचेच आहे. ठीक आहे ना! बनायचे आहे ना! मधुबन वाले बनायचे आहे! नो कम्प्लेंट? नो कम्प्लेंट. हिंमत ठेवणारे हात वर करा. नो प्रॉब्लेम. वाह! मुबारक असो, मुबारक असो, मुबारक असो.

बघा, निश्चयाचे प्रत्यक्ष प्रमाण आहे - रुहानी नशा. जर रुहानी नशा नाही तर निश्चय देखील नाही आहे. पूर्ण निश्चय नाही आहे, थोडा-फार आहे. तर नशा ठेवा, काय मोठी गोष्ट आहे! किती कल्प तुम्हीच बाप समान बनला आहात, लक्षात आहे? अगणित वेळा बनला आहात. तर हा नशा ठेवा आम्हीच बनलो आहोत, आम्हीच आहोत आणि आम्हीच पुन्हा-पुन्हा बनत राहणार. हा नशा सदैव कर्मामध्ये दिसावा. संकल्पामध्ये नाही, बोलामध्ये नाही, परंतु कर्मामध्ये, कर्माचा अर्थच आहे व्यवहारामध्ये, चेहऱ्यामध्ये दिसावा. तर होमवर्क मिळाला. मिळाला ना? आता बघू नंबरवार मध्ये येता की नंबरवन मध्ये येता. अच्छा.

बापदादांकडे कार्ड, पत्र, ई-मेल, प्रेमपूर्वक आठवण कॉम्प्युटर द्वारे देखील खूप आली आहेत आणि बापदादा दूर बसून दिलतख्तनशीन मुलांना, प्रत्येकाला नावासहित विशेषतेसहित प्रेमपूर्वक आठवण आणि हृदयापासून आशीर्वाद समोर इमर्ज करून देत आहेत. बापदादा जाणतात की प्रेम तर सर्वांचे आहेच आणि बापदादा सदैव अमृतवेलेला विशेष ब्राह्मण आत्म्यांना प्रेमपूर्वक आठवणीला विशेष प्रतिसाद देतात. त्यामुळे कार्ड देखील छान-छान बनवली आहेत, ती इथे (स्टेजवर) ठेवतात परंतु बापदादांकडे तर वतनमध्ये अगोदर पोहोचतात. अच्छा.

चोहो बाजूच्या चमकत असलेल्या आत्म-दीपक मुलांना, सदैव सफल करणाऱ्या सफलता स्वरूप मुलांना, सदैव अखंड महादानी, अखंड निर्विघ्न, अखंड ज्ञान आणि योगयुक्त, सदैव एकाच वेळी तीन सेवा करणारे मनसा व्हायब्रेशन द्वारे, वायुमंडळाद्वारे, वाचा-वाणी द्वारे, चलन आणि चेहरा अथवा कर्माद्वारे, तिन्ही सेवा एकाच वेळी एकत्र होतील तेव्हा तुमचा प्रभाव ‘चांगले आहे’ असे म्हणणाऱ्यांवर नाही, परंतु ‘चांगले’ बनणाऱ्यांवर पडेल. तर असे अनुभवी मूर्तद्वारे अनुभव करविणाऱ्या मुलांना बापदादांची नवीन वर्षासाठी पद्म-पद्मपटीने प्रेमपूर्वक आठवण, आशीर्वाद आणि हृदयाचे तख्त सदैव तख्तनशीन बनविणारे आहे, म्हणून चोहो बाजूच्या मुलांना जे सन्मुख आहेत, अथवा दूर बसून दिलतख्तावर आहेत, सर्वांना नावासहित आणि विशेषतेसहित प्रेमपूर्वक आठवण आणि नमस्ते.

अच्छा - जे पहिल्यांदा आले आहेत त्यांनी उठून उभे रहा. हात हलवा. बघा अर्धा क्लास पहिल्यांदाच आलेल्यांचा आहे. मागे असणारे हात हलवा. दिसून येत आहे टी. व्ही. मध्ये. पुष्कळ आहेत. अच्छा पहिल्यांदा येणाऱ्यांना बापदादांची खूप-खूप हृदयापासून मुबारक देखील आहे, आणि हृदयापासून प्रेमपूर्वक आठवण देखील आहे. जसे आता आला आहात, तर आता आलेल्यांना बापदादांचे वरदान आहे - “अमर भव”.

वरदान:- निंदा करणाऱ्याला देखील गुण-माळा घालणारे इष्ट देव, महान आत्मा भव

जसे आजकाल तुम्हा विशेष आत्म्यांचे स्वागत करताना गळ्यामध्ये कोणी स्थूल माळा घालतात तर तुम्ही घालणाऱ्याच्या गळ्यामध्ये रिटर्न करता, तशी निंदा करणाऱ्यांना देखील तुम्ही गुण-माळा घाला तर ते स्वतःच तुम्हाला गुण-माळा रिटर्न करतील कारण निंदा करणाऱ्यांना गुण-माळा घालणे अर्थात जन्म-जन्मांकरिता भक्त निश्चित करणे आहे. हे देणेच अनेक वेळचे घेणे होते. हीच विशेषता तुम्हाला इष्ट देव, महान आत्मा बनवते.

सुविचार:- आपली मनसा वृत्ति सदैव चांगली पॉवरफुल बनवा तर खराब देखील चांगले होईल.

||| ओम शांती |||

अव्यक्त इशारे:- अशरीरी आणि विदेही स्थितीचा अभ्यास वाढवा.

चोहोबाजूंनी कितीही कामाची ओढाताण होत असेल, बुद्धी सेवेच्या कार्यामध्ये अति बिझी असेल - अशा वेळी अशरिरी बनण्याचा अभ्यास करून बघा. यथार्थ सेवेचे कधी बंधन होत नाही कारण योगयुक्त, युक्तियुक्त सेवाधारी सदैव सेवा करत असताना देखील उपराम राहतात. असे नाही की सेवा जास्त आहे म्हणून अशरिरी बनू शकत नाहीत. लक्षात ठेवा - माझी सेवा नाही, बाबांनी दिलेली आहे तर निर्बंधन रहाल.